# विद्यापीठातील कारकीर्द समाधानकारक

## - कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; 'सकाळ'ला सदिच्छा भेटीत उलगडला पट

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठामध्ये पाच वर्षांपूर्वी कुलगुरू म्हणून रुजू झाले. या पाच वर्षांत अनेक नवीन उपक्रमांची सुरुवात झाली. महापूर असो की कोरोनाचे संकट असे विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी सर्वप्रकारची मदत समाजाला केली. अनेक लोकोपयोगी उपक्रम विद्यापीठामध्ये राबवले. सर्वच क्षेत्रात विद्यापीठाने चौफेर प्रगती केली. पाच वर्षांची कारकीर्द समाधानकारक आहे, असे भावोद्गार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केले. आज त्यांनी सकाळ कार्यालयाला भेट दिली. या वेळी त्यांनी 'सकाळ'चे संचालक-संपादक श्रीराम पवार यांच्याशी संवाद साधला.

कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या पदाचा कार्यकाळ १८ जूनला संपणार आहे. या पार्श्वभूमीवर आज त्यांनी सकाळ कार्यालयाला सदिच्छा भेट दिली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शनिवारी सकाळ कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी 'सकाळ'चे संपादक-संचालक श्रीराम पवार यांनी त्यांना पुस्तके भेट दिली. यावेळी निवासी संपादक निखिल पंडितराव उपस्थित होते.**

डॉ. शिंदे म्हणाले, "कोल्हापूरकरांनी मला भरभरून दिले. अनेक सामाजिक उपक्रमाचा एक भाग होण्याची संधी मिळाली. शिवाजी विद्यापीठातील ९९.२ टक्के विद्यार्थी हे ग्रामीण भागातील आहेत. ते अत्यंत कष्टाळू आणि प्रामाणिक आहेत. त्यांच्यातील आत्मविश्वास वाढावा, जागतिक स्पर्धेत उतरण्यासाठी त्यांच्यातील कौशल्याचा विकास व्हावा यासाठी विविध उपक्रम राबवले."

'सकाळ'चे संचालक-संपादक श्रीराम पवार म्हणाले, "तुम्ही सर्वांशी सुसंवाद ठेवला त्यामुळे अनेक गोष्टी चांगल्या पद्धतीने करता आल्या. सध्या जगभर डेटा ॲनॅलिसिसची आवश्यकता मोठ्या प्रमाणात आहे. यासाठी विविध कोर्सदेखील उपलब्ध आहेत. नोकरी, व्यवसाय करत या विषयीचे शिक्षण घेता येईल असा अभ्यासक्रम विकसित होणे आवश्यक आहे." त्याचबरोबर ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. विलास संघवी यांच्या कार्याची ओळख भावी पिढ्यांना व्हावी यासाठी काही योजना आखावी." याला सकारात्मक प्रतिसाद देत याबाबत निश्चित काही करण्याची ग्वाही डॉ. शिंदे यांनी दिली. 'सकाळ'चे निवासी संपादक निखिल पंडितराव, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. अलोक जत्राटकर हे उपस्थित होते.

### डॉ. शिंदे म्हणाले...

- विद्यापीठाचे नाव आंतराष्ट्रीय पातळीवर
- संशोधनामध्ये वाढीसाठी विविध योजना
- आंतराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्राध्यापकांचे शोधनिबंध
- पदाचा उपयोग सर्वसामान्य घटकासाठी केला.

तरुण भारत

# यंदा ३० टक्के अभ्यासक्रम ऑनलाईन

## कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती : अंतिम वर्षाच्या परीक्षा घेणे आवश्यक : शिवाजी विद्यापीठाकडे ऑनलाईन अभ्यासक्रमाची क्षमता

प्रतिनिधी
कोल्हापूर

ग्रामीण भागाशी नाळ असणाऱ्या शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवून आपला ब्रँड तयार केला आहे. कोराना विषाणूचा धोका अद्यापही टळलेला नाही. मात्र आता कोरोनासोबत जगणे काळाची गरज बनली आहे. यामुळे शिवाजी विद्यापीठाने आगामी शैक्षणिक वर्षापासून एकूण अभ्यासक्रमाच्या ३० टक्के अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने शिकवण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरु पदाच्या कार्यकालाची मुदत संपत आल्याने शनिवारी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी 'तरुण भारत' कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी 'तरुण भारत'चे निवासी संपादक मनोज साळुंखे, जाहिरात व्यवस्थापक (ग्रामीण) आनंद साजणे, जाहिरात व्यवस्थापक (शहर) मंगेश जाधव, मुख्य प्रतिनिधी संजीव खाडे उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी 'तरुण भारत' कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी उपस्थित 'तरुण भारत चे निवासी संपादक मनोज साळुंखे, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर.**

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, कोरोना विषाणूचा फैलाव वेगाने होत आहे. यामुळे आता स्वत:ची काळजी स्वत: घेणे गरजेचे बनले आहे. सकारात्मक मानसिकता करुन जगल्यास कोरोनाला हरवणे नक्कीच शक्य होणार आहे. याचाच एक भाग म्हणून शिवाजी विद्यापीठानेही आता काळानुरुप बदल करण्याचे ठरवले आहे. आगामी शैक्षणिक वर्षामध्ये बी. ए. बी. कॉम, बी. एस्सी यासह विविध अभ्यासक्रमांचा ३० टक्के अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने शिकवण्यात येणार आहे. यासाठी ई कंटेन्ट तयार करण्याचे काम सुरु आहे. सद्या १ हजार लेक्चरचा ई कंटेंट तयार करण्यात आला आहे. यासाठी २ स्टुडिओ तयार करण्यात आले आहेत. शिवाजी विद्यापीठाचा पाया ग्रामीण भागावर अवलंबून असतानाही विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय स्तरावर मानांकन प्राप्त केले आहे. गेल्या काही वर्षात विद्यार्थ्यांना ऑनलाईन पेमेंट, ऑनलाईन डॉक्युमेंट असे विविध विद्यार्थीकेंद्रीत निर्णय राबविण्यात आले आहेत.

### देशपातळीवर एकच निर्णय घ्यावा

आगामी शैक्षणिक वर्षाबाबत देशपातळीवर एकच निर्णय घ्यावा. म्हणजेच सर्वांच्या गुणवत्तेचे समान मुल्यांकन केल्यासारखे होईल. यामुळे सर्व देशातील शैक्षणिक वर्षाबाबत राष्ट्रपती महोदयांनी निर्णय घ्यावा असे मत कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केले.

### १ ते ३१ जुलै दरम्यान अंतिम वर्षाच्या परीक्षा

अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत सद्या सर्वत्र गोंधळ सुरु आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षा संदर्भात नेमण्यात आलेल्या समितीने १ ते ३१ जुलै दरम्यान अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यात याव्यात अशा सुचना केल्या आहेत. याबाबत अद्यापही निर्णय सुरु आहेत..

### कोल्हापूरने जगायला शिकवले

मुंबई, पुणे, औरंगाबाद येथील विद्यापीठांपेक्षा कोल्हापूरमध्ये वेगळा अनुभव आला. कोल्हापूरातील नागरिक सजग आहेत. येथील नागरिकांनी मोकळेपणाने कसे जगायचे हे शिकवल्याचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले. तसेच ५ वर्षाच्या कार्यकालामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक यांना केंद्रबिंदू समजून काम केले. विद्यापीठातील शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. त्याच्यापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे काम केले. मात्र काही गोष्टी करायच्या राहून गेले असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.


आ. राजे

# कोल्हापूरने जगायला शिकवले

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : दै. 'पुण्यनगरी' कार्यालयास सदिच्छा भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जगभरातील अनेक शहरांत आजवर वास्तव्य केले. या सर्व शहरांनी रहायला शिकवले, तर कोल्हापूरने जगायला शिकवले, असे भावनिक उद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले. शनिवारी त्यांनी दै. 'पुण्यनगरी'च्या कोल्हापूर कार्यालयास सदिच्छा भेट दिली, त्यावेळी संवाद साधताना ते बोलत होते.



कोल्हापूर : दै. 'पुण्यनगरी' कार्यालयास सदिच्छा भेटीवेळी वृत्त संपादक राजेंद्रकुमार चौगले यांना 'शिव-वार्ता : माध्यमांच्या नजरेतून विद्यापीठ' आणि पद्मश्री (कै.) डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे प्रकाशित पुस्तके भेट देताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. आलोक जत्राटकर, मुख्य प्रतिनिधी विजय पाटील व चंद्रकांत पाटील आदी. (छाया : पांडुरंग पाटील)

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाला मोठा इतिहास आहे. ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात विद्यार्थी येथे दाखल होतात. उपजतच असलेली कष्ट करण्याची तयारी आणि प्रामाणिकपणा या विद्यार्थ्यांत असतो. गेल्या ५ वर्षांत विविध अभ्यासक्रमांद्वारे विद्यार्थ्यांची ही गुणवत्ता जागतिक पातळीवर आणण्याचे काम शिवाजी विद्यापीठाने केले. कोल्हापूरमध्ये समाजातील प्रत्येक घटकाची विद्यापीठाशी बांधिलकी आहे. अतिशय सकारात्मकपणे येथील नागरिक विद्यापीठाशी जोडले गेले आहेत. इतर ठिकाणी अशा प्रकारची बांधिलकी अभावानेच आढळते. त्यामुळे कोल्हापूरमधील कारकीर्द नेहमीच स्मरणात राहील.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते. दै. 'पुण्यनगरी'चे वृत्त संपादक राजेंद्रकुमार चौगले यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

### बदलांना सामोरे जायला हवे

कोविडनंतर शिक्षण क्षेत्रामध्येही आमूलाग्र बदल घडणार आहेत. शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर प्रभावीपणे वाढणार आहे. या बदलांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थी, पालक तसेच शिक्षकांनी तंत्रज्ञान स्नेही होण्याबरोबरच स्वतःची मानसिकता बदलणे आवश्यक आहे, असेही कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले.

# सर्वाधिक संलग्नित महाविद्यालयांना भेट देणारे कुलगुरू

## डॉ. देवानंद शिंदे यांच्या पाच वर्षांत ११६ महाविद्यालयांना भेटी । बहुतांशी सरप्राईज व्हिजिटचा समावेश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे हे विद्यापीठ परिक्षेत्रातील २९७ महाविद्यालयांपैकी सर्वाधिक संलग्नित महाविद्यालयांना भेटी देणारे कुलगुरू ठरले आहेत. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील सुमारे ११६ महाविद्यालयांना नियोजित कार्यक्रमांसह सदिच्छा भेटी किंवा सरप्राईज व्हिजिट दिल्या आहेत.

कुलगुरू डॉ. शिंदे शिवाजी विद्यापीठात रुजू झाल्यानंतर त्यांना विविध कार्यक्रमांसाठी निमंत्रित केले जात असे. संबंधित कार्यक्रमांसाठी जात असताना त्या मार्गावर विद्यापीठाशी संलग्नित



कोल्हापूर : संलग्नित महाविद्यालयातील पूरबाधित ग्रंथसंपदेच्या पाहणीप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

महाविद्यालयांना कुलगुरू अचानकपणे भेट देत असत.

विद्यार्थ्यांसमवेत गप्पा मारत चहापान करणे, एखाद्या वर्गात अचानकपणे जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, सर्व स्टाफशी संवाद साधणे आणि सर्वात शेवटी प्राचार्यांची भेट घेणे अशी सर्वसाधारण कुलगुरूंची सरप्राईज व्हिजिट असे.

कोणताही औपचारिक सत्कार वगैरे न स्वीकारता थेट विद्यार्थ्यांशी सहज संवाद साधणारे कुलगुरू म्हणून डॉ. देवानंद शिंदे यांची ओळख विद्यापीठ परिक्षेत्रात आहे. त्यांनी आपल्या पाच वर्षांच्या कालावधीत कोल्हापूर जिल्ह्यातील ३२, सांगली जिल्ह्यातील ३८ आणि सातारा जिल्ह्यातील ४६ अशा एकूण ११६ संलग्नित महाविद्यालयांना भेटी दिल्या.

### मुंबई विद्यापीठाच्या कारकीर्दीत...

मध्यंतरीच्या काळात मुंबई विद्यापीठाचा प्रभारी कार्यभारही कुलगुरू डॉ. शिंदे यांच्याकडे होता. मुंबईतल्या चर्चगेटपासून ते सिंधुदुर्गातील बांद्यापर्यंत ७६२ संलग्नित महाविद्यालये असा मुंबई विद्यापीठाचा विस्तार. कुलगुरूंनी ठरवले तरी, या संलग्नित महाविद्यालयांना भेटी देणे शक्य होत नाही. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी मात्र ११ महाविद्यालयांना भेटी दिल्या.

### 'पदामुळे निर्माण होणारी दरी सांधण्यासाठीच भेटी'

पदाच्या दबावामुळे कुलगुरू आणि संलग्नित महाविद्यालये अगर सर्व संबंधित घटक यांच्यामध्ये एक प्रकारची अप्रत्यक्ष दरी निर्माण होते. ती दरी संवादाच्या माध्यमातून सांधली जावी, जास्तीत जास्त घटकांपर्यंत, विशेषतः विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे आणि त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्या अपेक्षा जाणून घ्याव्यात, अशी या सरप्राईज व्हिजिटमागे भूमिका असे.

**- कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे**

### महापूर काळात...

गतवर्षी महापूर ओसरल्यानंतर कुलगुरूंनी पूरबाधित महाविद्यालयांच्या पाहणीसाठी सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांचा केलेला दौरा हा अत्यंत हृद्य ठरला. महाविद्यालयांची, विशेषतः तेथील ग्रंथालयांतील पुस्तके, प्रयोगशाळा आणि फर्निचरची पुराने झालेली दुरवस्था पाहून त्यांचा कंठ दाटून आला. पूरबाधित महाविद्यालयांना दुरुस्ती, पुस्तक खरेदी इत्यादी बाबींसाठी आर्थिक मदत जाहीर केली.